पीएच.डी.
संशोधन आराखडा

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत, इतिहास विषयातील पीएच. डी.
(विद्या वाचस्पती) या पदवीकरिता

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास सादर केल्या जाणा-या शोधप्रबंधाचा आराखडा

हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील आर्यवैश्य समाजाचे योगदान
(विशेष संदर्भ- मराठवाडा)

संशोधक
बलशेटवार शिवशंकर ज्ञानोबा
शिरूर ताजबंद, ता.अहमदपूर
(एम.ए.,)
मार्गदर्शक
डॉ. दामाजीवले माधव दिगंबर
(एम.ए., एम.फील.,पीएच. डी.)
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद, जि. लातूर

: इतिहास संशोधन केंद्र :
पानसरे महाविद्यालय अर्जापूर, जि.नांदेड

जुलै २०२२

हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील आर्यवैश्य समाजाचे योगदान
(विशेष संदर्भ- मराठवाडा)

प्रस्तावना :

इस १५२६ मध्ये पानिपतच्या पहिल्या युद्धाने भारतात मोगल सत्तेची स्थापना झाली.या घराण्यात बाबर,अकबर, जहांगीर शहाजहान व औरंगजेब हे पराक्रमी शाषक होते. मोगल बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्यात अंतर्गत कलह निर्माण झाला त्याचा फायदा संधिसाधू सरदार निजाम उल मुल्कने घेऊन दक्षिणेत स्वतंत्र राज्य निर्माण केले. या हैदराबाद संस्थानांमध्ये तेलगू, कन्नड व मराठी अशा तीनही भाषा बोलणा-या लोकांचा समावेश होत होता.

या हैदराबाद संस्थानात बहुसंख्य हिंदू होते. तर राज्यकर्ते हे इस्लाम होते. त्यांची भाषा उर्दू होती. प्रशासनातही उर्दू ही प्रमुख भाषा होती. संस्थानात भाषा व धर्माची विविधता असली तरी त्यावर इस्लाम धर्माचा प्रभाव होता. मराठवाडा विभागात तर या काळात इस्लामी संस्कृतीची एवढी छाप होती की त्यामुळे मराठी भाषा व संस्कृतीची निजामी जुलमी राजवटीत कोंडी झाली होती. ही कोंडी फोडण्याचे काम हैदराबाद मुक्ती संग्राम लढ्यातील नेत्यांनी केल्याचे दिसून येते.

निजामांची अन्यायी, अत्याचारी सत्ता नष्ट करण्याचे व इस्लाम धर्माचा राजकीय प्रभाव नष्ट करण्याचे कार्य एकाएकी झालेले नसून हैदराबाद स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी इ.स अठराशे पासून दिसून येते. इ.स १७२४ ते १९४८ या २२५ वर्षाच्या राजवटीत संस्थानातील इतर प्रदेशाप्रमाणेच मराठवाड्यातही प्रचंड प्रमाणात विषमता निर्माण झाली होती. सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय जीवनात मराठवाड्यातील जनता उपेक्षिली गेली होती.यामध्ये आर्यवैश्य व उपेक्षित जनतेने ब्रिटिश व निजामाच्या सत्तेला हादरे देऊन ही विषमता नष्ट करण्याचे सतत प्रयत्न केले होते. हैदराबाद संस्थानाच्या स्थापनेनंतर निजामाने ब्रिटिशांशी इ.स

१८०० मध्ये केलेल्या तैनाती फौज पद्धतीच्या तहामुळे संस्थानात निजामाबरोबर ब्रिटिशांचा ही प्रभाव वाढत गेला.

इस १८०० ते १९४८ या कालखंडात संस्थानातील तेलंगणा व कर्नाटकाप्रमाणेच मराठवाड्यातील जनतेने प्रामुख्याने त्यात अनेक जाती होत्या या लढ्यात आर्य वैश्य समाजाने पण योगदान दिले आहे. या लढ्यांना अपयश आले असले तरी त्यातून स्वातंत्र्याची भावना जनतेमध्ये वाढत गेली. मराठवाड्यातील भिल्ल, कोळी, रामोशी, दलित, हटकर व आर्यवैश्य अशा सामान्य जनतेने निजामी राजवटी विरुद्ध लढे दिले.

इस १८०० ते १९११ मराठवाड्यात अनेक ठिकाणी निजाम व इंग्रज सरकारविरुद्ध अनेक लहान मोठे उठाव झाले. १९११ ते १९४८ या कालखंडात निजाम मीर उस्मान अली खानची हैदराबाद संस्थानावर सत्ता होती. या काळात संस्थानात प्रचंड प्रमाणात अशांतता निर्माण झाली. राजसत्ता अनियंत्रित बनली इस्लाम धर्माचा प्रभाव अधिक वाढला. बिगर इस्लाम धर्मीयांचा छळ सुरू झाला हिंदूवर अनेक प्रकारचे बंधने लादण्यात आले. गस्ती निशान सारखे काळे कायदे करून निजामाने आपल्या सत्तेचा दबदबा निर्माण केला.

त्यातच इत्तेहादुल मुस्लिमीन सारख्या जातीय संघटनेचा उदय झाला.अतिरेकी विचारांनी भारावलेल्या मुस्लीम पुढा-यांचा उदय झाल्यामुळे इतर धर्मियांचे जीवन दोलायमान झाले.भाषण लेखन मुद्रण स्वातंत्र्यावर अघोषित बंदी घातली गेली. निजामांच्या अन्यायी, अत्याचारी धोरणाचा आर्यवैश्य समाजावरही फार मोठा आघात झाला.

संशोधन विषयाची निवड :

आपण मराठवाड्याचे भूमिपुत्र असल्याकारणाने मराठवाड्याचा प्रादेशिक इतिहास जाणून घेण्याची उत्सुकता मनामध्ये निर्माण झाली होती. तसेच या भागाचा प्राचीन, ऐतिहासिक, उज्ज्वल वारसा नजरेत भरण्यासारखा आहे. मध्ययुगात व निजामाच्या राजवटीत मराठवाड्याची स्थिती अशी होती. मराठवाडा हा भूभाग हैदराबादच्या निजामाच्या संस्थानात मोडत होता. तेथील बहुतांश प्रजा हिंदू असून राज्यकर्ते मात्र मुस्लिम होते. मुस्लिम सत्तेच्या प्रभावाखाली मराठवाड्यातील जनता कशा प्रकारचे जीवन जगत होती. व्यापर करणा-या आर्यवैश्य समाजाची स्थिती व मुक्ती लढ्यातील यौगदान याबद्दल आत्तापर्यंत कोणत्याही संशोधकांनी लक्ष दिले नाही त्यामुळे आर्यवैश्य समाजाचे हैदराबाद मुक्ती संग्राम लढ्यातील योगदान याचा प्रामुख्याने अभ्यास करण्याचा माझ्या संशोधनाचा हेतू आहे.

तसेच निजामाच्या व अप्रत्यक्ष ब्रिटिशांच्या राजवटीत जनतेवर होणा-या अन्याय अत्याचाराविरुद्ध जनतेने लढे दिले या लढायांची माहिती जाणून घेण्याची मला उत्सुकता आहे. आतापर्यंत मराठवाड्याचा प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक इतिहासप्रेमी संशोधकांनी संशोधन करून ऐतिहासिक वारसा उजेडात आणला आहे. परंतु निजाम राजवटीत मराठवाड्यातील जनतेने दिलेल्या लढ्याचा व हैदराबाद मुक्ती लढ्यात आर्यवैश्य समाजाचे योगदान हे एकत्रित अभ्यास करून सुसंघटित मांडणी करण्यासाठी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

साहित्याचे पुनरावलोकन /पूर्व संशोधनाचा आढावा :

हैदराबाद मुक्ती संग्राम लढ्यायाबाबत अनेक संशोधकांनी संशोधन केले आहे. यासंबंधी प्रकाशित झालेला संदर्भ ग्रंथाचा संशोधनकार्यात उपयोग करून घेतला जाणार आहे. हैदराबाद स्टेट कमिटीने प्रकाशित केलेल्या दी फ्रीडम स्ट्रगल इन हैदराबाद खंड १ ते ४ व मराठवाड्यातील पाचही जिल्ह्याचे गॅझेटियर, तसेच गॅझेटियर ऑफ निजामस अ डोमेनियम, स्वातंत्र्य सैनिक चरित्रकोश, डॉ.भ.ग कुटे, महाराष्ट्र राज्य मराठवाडा विभाग, सेतु माधवराव पगडीचे अठराशे सत्तावनचे आणखी काही पैलू.

प्रा. डॉ दामाजीवाले एम. डी यांचे हैदराबाद संस्थानातील लढ्याचा अभ्यास विशेषतः मराठवाड्याच्या संदर्भात सन १८०० ते १९४८,व हैदराबाद स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, अनंत भालेराव यांचे हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा,वसंत पोतदार यांचे हैदराबाद स्वातंत्र्य संग्राम,नरहर कुरुंदकरांचे हैदराबाद विमोचन आणि विसर्जन.

नरेंद्र चपळगावकर यांचे कर्मयोग संन्याशी, देशपांडे द.ग यांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम, शंकरभाई पटेल यांचे हैदराबादचा मुख्य स्वातंत्र्य संग्राम, डॉ. चंद्रशेखर लोखंडे यांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम का इतिहास, नरेंद्र गायकवाड यांचे मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम,भीमराव पिंगळे यांच्या काळोखातील मशाली, वि.गो खोबरेकर यांचे महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे, सौ.शोभा कोरान्ने यांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम ऑपरेशन, उमरी बँक,आ.कृ वाघमारे यांचा संघर्ष खंड १ व २, संपादन स.मा गर्गे.

उत्तम सूर्यवंशी व अण्णाराव टाकळगव्हाणकर यांचे हैदराबादचा मुक्तिसंग्राम, ढेंगळे बी.एस यांचे हैदराबाद फ्रीडम स्ट्रगल, काटे पी .व्ही यांचे मराठवाडा अंडर दि निजाम, आर.जी बर्तन यांचे दे हिस्ट्री ऑफ हैदराबाद कॉन्टेन्ट आणि प्रभाकर देव यांनी संपादन केलेले हैदराबाद मुक्तिसंग्राम, स्वातंत्र्यसैनिकांच्या मौखिक नोंदी. द.प जोशी संपादक निजाम विजय इत्यादी अनेक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. या प्रकाशित ग्रंथातून हैदराबादच्या संस्थानातील मराठवाडा प्रदेशातील लढ्याची माहिती मिळविणे आवश्यक आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:

हैदराबाद राज्याची स्थापना कशी झाली हैदराबाद संस्थानातील निजाम शासकाचे मराठवाड्यातील जनतेविषयक धोरणाचा अभ्यास करणे.

१. हैदराबाद संस्थानात व मराठवाड्यातील आर्यवैश्य समाजाचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२. हैदराबाद संस्थानातील निजामांच्या अन्यायी अत्याचारी राजवटी विरुद्ध मराठवाड्यातील जनतेने दिलेल्या लढ्यामागची भावना अभ्यासणे.

३. मराठवाड्यातील जनतेने निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्ध स्वातंत्र्यासाठी केलेल्या बलिदानाची व त्यागाची आजच्या पिढीला माहिती करून देणे.

४. हैदराबाद राज्यातील आर्थिक विकासात आयरे वैश्य समाजाचे योगदान होते याचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धतीः

मानव हा इतर प्राण्यांपेक्षा जिज्ञासू वृत्तीचा आणि बुद्धिजीवी प्राणी आहे.त्यामुळे तो नैसर्गिक घटना तसेच ऐतिहासिक घटना बाबत माहिती मिळविण्याचा सतत प्रयत्न करीत असतो. या सर्व अज्ञात बाबींची माहिती करून घेण्यासाठी संशोधनाची आवश्यकता असते.

संशोधन म्हणजे एखादी बाब किंवा विषय अज्ञात असेल, तिचा सहजासहजी शोध लागत नसेल, तर त्यासाठी विशेष परिश्रम घ्यावे लागतात.अभिनव वस्तुस्थिती पाहण्यासाठी हाती घेतलेले संशोधन कार्य, शोधकार्य म्हणजे संशोधन होय. प्रस्तुत लघुशोध प्रबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. या कालखंडातील आर्यवैश्य समाजाची माहिती घेण्यासाठी संदर्भ ग्रंथाचा आधार घेऊन पुनर्मांडणी केली आहे.

संशोधनाची गृहितके:

१. हैदराबाद संस्थानातील निजाम शासक हे शोषक व अन्यायीवृत्तीचे होते.

२. प्रस्थापित राजवटीविरुद्ध मराठवाड्यातील जनतेने अनेक वेळा लढे दिले.परंतु निजामाने हे लढे मोडून काढण्यासाठी इंग्रजांची मदत घेतली.

३. हैदराबाद संस्थानांमध्ये निजामाने आर्यवैश्य समाजावर अन्याय अत्याचार केला.

४. निजामाच्या सरंजामी व्यवस्थेमुळे मराठवाड्यातील सर्वसामान्य प्रजेच्या हालअपेष्टा वाढल्या यातूनच निजामी राजवटीविरुद्ध असंतोष निर्माण झाला.

५. निजाम शासक इस्लाम धर्मीय होते.संस्थानात इस्लाम धर्माचा प्रभाव होता.

६. निजाम राजवटीत मराठवाड्यातील जनतेला अरब, रोहिले, पठाण या जहागीरदार व सावकाराकडून त्रास होत होता.

७. प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य प्राप्तीचा अधिकार आहे, म्हणून हैदराबाद शासकाने आपल्या संस्थानातील प्रजेला स्वातंत्र्य दिले पाहिजे अशी भूमिका उठाव करणा-या जनतेची व नेत्यांची होती.

संदर्भ साधने :

कोणतेही ऐतिहासिक संशोधन हे संदर्भ साधनाशिवाय होत नाही प्रसिद्ध इतिहासकार लॉजी लॉस व सेंड्र बॉसच्या मते, **No Documents No History** पुरावा नाही तर इतिहास नाही. म्हणून इतिहासाचे सत्यकथन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम दर्जाची संदर्भ साधने आवश्यक असतात **"हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील आर्यवैश्य समाजाचे योगदान (विशेष संदर्भ- मराठवाडा)"** या विषयात संशोधन करताना इंग्रजी हिंदी व मराठी भाषेतील ग्रंथाचा वापर केला जाणार आहे.

या विषया संबंधी प्रकाशित साहित्य, संशोधन पत्रिकेतील लेख संशोधन प्रबंध इत्यादीचा आधार घ्यावा लागला. तसेच या काळातील उपलब्ध झालेल्या गुप्तचर खात्याच्या अहवाल याचा आधारही घेण्यात आला. उपलब्ध संदर्भ ग्रंथाचे वाचन करून त्यातील संदर्भाचा योग्य ठिकाणी उल्लेख करून प्रस्तुत शोध प्रश्न तयार करून सर्व समावेश संदर्भ ग्रंथांची यादी शोध प्रबंधाचा शेवटी दिली आहे.

विषयाचे महत्त्व

१५ ऑगस्ट १९४७ ला हैदराबाद भारतात विलीन होण्यास तयार नव्हते. त्यामध्ये हैदराबादच्या निजामाने आपले संस्थान स्वतंत्र ठेवण्याची तयारी चालविली होती. या संस्थानातील जनतेने स्वातंत्र्याची मागणी केली. त्यासाठी अनेक चळवळी केल्या लढे दिले अठराशे पासून निजामाच्या अन्यायी अत्याचारी व ब्रिटिश धार्जिण्या मराठवाड्यातील जनतेने विरोध केला. मराठा सत्तेचा -हासासानंतर निजामाने जनतेवर अनन्वित अत्याचार चालविले.

तेव्हा पासून निजामाची सत्ता नष्ट करण्याचा मराठवाड्यातील जनतेचे प्रयत्न चालविला होता. जनतेने हे लढे असंघटित होते निजामाने ब्रिटिश लष्कराच्या मदतीने ते मोडून काढले. परंतु ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य दिले तरीही निजाम संस्थानी प्रजेला स्वातंत्र्य देत नव्हता. म्हणून स्वतंत्र भारत सरकारने अन्याय-अत्याचार निजामला वठणीवर आणण्यासाठी १३ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर १९४८ या कालावधीत पोलीस कारवाई करून हैदराबाद संस्थान स्वतंत्र भारतात विलीन केले. या मुक्तिसंग्रामात आर्य वैश्यसमाजाचे योगदान फार मोठे होते हे नाकारता येत नाही .

हैदराबाद संस्थानात ख-या अर्थाने १९३८ पासून राजकीय व सामाजिक प्रबोधन सुरू झाले. निजामाच्या प्रतिगामी राजवटीत नागरी स्वातंत्र्यावर विविध प्रकारचे निर्बंध होते. हैदराबाद संस्थानातील विषेशता मराठवाड्यातील जनतेची स्थिती अत्यंत दयनीय होती. आर्यवैश्य समाजाने अनेक ठिकाणी स्थळी चळवळी केल्या या चळवळीत व सशस्त्र लढ्यात अनेकांनी भाग घेतला. अनेकांनी वीरमरण पत्करले.संसाराचा त्याग केला शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्यातील जनता निजामाच्या अन्याय-अत्याचारातून मुक्त झाली.

प्रकरण पहिले

पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात हैदराबाद संस्थानाची भौगोलिक पार्श्वभूमी चा आढावा घेतला आहे. निजामकालीन मराठवाड्याच्या सीमा, निजाम राजवटीची स्थापना,याघराण्यातील होऊन गेलेल्या राजांची माहिती, धोरणे, राजकीय,आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

प्रकरण-दुसरे

आर्यवैश्य समाजाची पार्श्वभूमी व उत्पत्ती

आर्यवैश्य हा प्राचीन हिंदू समाज व्यवस्थेनुसार एक वर्ण होता. यावर्णातील व्यक्ती व्यापार व इतर अर्थव्यवस्थेशी संबंधित कामे करायची. आधुनिक भारतात वर्णव्यवस्था होती. हा एक व्यापारी वर्ग होता. त्या वर्गातील लोकांना वैश्यवाणी म्हणत असे हा वैश्यवाणी समुदाय व्यापार आणि व्यवसायासाठी वेगवेगळ्या भागात गेला.

कालांतराने त्याच ठिकाणी त्यांनी आपला समुदाय निर्माण केला. यावरून वैश्यवाणी समुदाय व्यापार आणि व्यवसायासाठी वेगवेगळ्या भागात गेला. या प्रकरणात आर्यवैश्य समाजाची उत्पत्ती व हैदराबाद संस्थानातील मुक्ती लढ्यातील योगदान पाहणार आहोत.

प्रकरण तिसरे

मराठवाड्यातील चळवळ व आर्यवैश्य समाज

मराठवाड्याचे चळवळ व आर्यवैश्य हे शोध प्रबंधतील तिसरे प्रकरण आहे. या प्रकरणात मराठवाड्याचे प्रबोधन व संघटन कसे झाले याचा आढावा घेतला आहे. १९३८ मध्ये वंदे मातरम सत्याग्रह चळवळ केली. तसेच हैदराबादराज्याचे प्रश्न सोडविण्यासाठी २९ जून १९३८ रोजी हैदराबाद स्टेट काँग्रेस ची स्थापना करण्यात आली. निजामाच्या विरोधात व या प्रबोधन व संघटन चळवळीतील आर्य

वैश्य समाजाचे योगदान मोठे आहे. या सर्व घटनांचा आढावा या प्रकरणात घेतला आहे.

प्रकरण चौथे

हिंदुमहासभा व आर्यवैश्य समाजाची चळवळ

या प्रकरणांमध्ये हिंदू महासभा व आर्य वैश्य समाज यांनी अनेक ठिकाणी चळवळी केल्या आहेत थोडक्यात हिंदुमहासभा आर्य वैश्य समाजाचे चळवळी व योगदान पाहणारा आहेत. हैदराबाद हिंदुमहासभेचे प्रमाणेच आर्य वैश्य समाज या संघटनेने ही **२७** ऑक्टोबर १९३८ रोजी हैदराबाद हिंदुमहासभेचे पाठोपाठ निजाम सरकारच्या विरुद्ध सत्याग्रह केला.

प्रकरण पाचवे

हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील आर्यवैश्य समाजाचे कार्य

प्रस्तुत प्रकरणांमध्ये हैदराबाद स्टेट कॉंग्रेसने निजाम सरकारच्या विरोधात केलेल्या मुक्ती आंदोलनाचा आढावा घेतला जाणार आहे. अनुक्रमे सत्याग्रह आंदोलन, जंगल सत्याग्रह, झेंडा सत्याग्रह, उमरी बँक सशस्त्र लढा विविध लढ्यातील आर्यवैश्य समाजाच्या योगदानाचा आढावा घेतला जाणार आहे. मराठवाड्यातील जनतेने निजाम सरकारच्या विरोधात लढा दिला.

हैदराबाद संस्थानातील जनतेने हिंदुमहासभा अरे समाज आणि हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली अहिंसक व सनदशीर मार्गाने केलेल्या सत्याग्रह पुढे निजाम सरकार वाकले नाही.उलट सरकारने रझाकार पठाण रोहिले आणि पोलिसांच्या मदतीने जनतेवर अन्याय-अत्याचार केले. त्याविरुद्ध मराठवाड्यात आर्यवैश्य समाजाने अनेकठिकाणी लढे दिले.

यामध्ये कल्हाळी, चिलवडी, नांदेड, सावरगाव, उमरी, बर्दापूर याशिवाय इतर ठिकाणीही झालेले सशस्त्र लढे महत्त्वाचे ठरतात व आर्यवैश्य समाजातील उत्तरवार यांनी उमरी बँक सशस्त्र लढा दिला.या मध्ये आर्यवैश्य समाजाचे योगदान महत्त्वपूर्ण असलेले दिसून येते.

प्रकरण सहावे

उपसंहार

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाचा निष्कर्ष दिला जाणार आहे. प्रस्तुत संशोधन आराखडा हा संभाव्य आराखडा असून संदर्भ साधनांच्या उपलब्धतेनुसार प्रकरणात कमी-अधिक बदल होऊ शकतो.

संदर्भ ग्रंथ सूची

१. अ.भी राजन, नांदेड जिल्हा साहित्य व शोध १९८५

२. कठारे अनिल, हैदराबाद राज्याच्या इतिहास कल्पना प्रकाशन नांदेड २००५

३. कठारे अनिल आणि वाघमारे महादेव, हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाड्यातील दलित समाज कल्पना प्रकाशन नांदेड २००६

४. काळे भगवान मराठवाडा काल आणि आज संकेत प्रकाशन जालना प्रथमावृत्ती १९८६

५. कुरुंदकर नरहर, हैदराबाद विमोचन आणि विसर्जन संपादन, जोशी मुसाप आंध्र प्रदेश हैदराबाद १९८५

६. कुरुंदकर नरहर, हैदराबाद विमोचन आणि विसर्जन रजत प्रकाशन, औरंगाबाद द्वितीय आवृत्ती १९९८

७) कुंठे भगत, स्वातंत्र्यसैनिक चरित्रकोश, मराठवाडा विभाग, महाराष्ट्र राज्य दर्शनिका विभाग मुंबई १९७६

८. खोबरेकर वि.गा,महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे म.रा. सा.स मंडळ, मुंबई १९९४

९. श्रीनिवासा आणि विधी दिगंबर, हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि आम्ही, साकेत प्रकाशन औरंगाबाद १९९३

१०. गर्गे स.मा संघर्ष खंड आ.कृ वाघमारे स्मारक समिती, औरंगाबाद १९४७

१२. गोगटे श्री. ब मराठवाड्यातील शिक्षण स्वा.रा. ती संस्था औरंगाबाद २००८
१३. देशमुख लक्ष्मीकांत ब धारूरकर वि.ल मराठवाडा मुक्तिसंग्राम मराठवाडा साहित्य परिषद औरंगाबाद १९९८
१४. स्वामी रामानंद तीर्थ हैदराबाद स्वातंत्र्यसंग्राम आठवणी आणि वि.पा देऊळगावकर स्वा.रा.ती स्मारक समिती, हैदराबाद, द्वितीय आवृत्ती १९९८

संशोधक
बलशेटवार शिवशंकर ज्ञानोब
शिरूर ताजबंद, ता.अहमदपूर
(एम.ए.,)

मार्गदर्शक
डॉ. दामाजीवले माधव दिगंबर
(एम.ए., एम.फील.,पीएच. डी.)
स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद,
जि. लातूर